सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानपरिषद

## " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समिती "

## (२०२१ - २०२२)

## सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समितीचा अहवाल

(हा अहवाल विधानपरिषद सभागृहाला
दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०२२.

# महाराष्ट्र विधानपरिषद

" सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत
तदर्थ समिती "
(२०२१ - २०२२)

सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत
तदर्थ समितीचा
अहवाल

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (१) | प्रस्तावना | ३ |
| (२) | पार्श्वभूमी | ५ |
| (३) | समितीच्या बैठकांसंबंधातील संक्षिप्त माहिती | १० |
| (४) | अभिप्राय व शिफारशी | २५ |
| (५) | परिशिष्ट-समितीच्या बैठकींचा तपशील | २९ |

# महाराष्ट्र विधानपरिषद
# सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत
# तदर्थ समिती
## (२०२१-२०२२)

### सदस्यांची सूची

(१) डॉ. नीलम गो-हे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

(२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

(३) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.

(४) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(५) श्री. रामराव पाटील, वि.प.स.

(६) **रिक्त**

(७) **रिक्त**

(८) **रिक्त**

**विशेष निमंत्रित**

(९) श्री. अंबादास दानवे, मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद.

(१०) श्री. चंद्रकांत पाटील, मा. उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री.

**मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे या समितीचे समिती प्रमुख राहतील.**

**मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, मा. संसदीय कार्य मंत्री व मा. संसदीय कार्य राज्यमंत्री हे या समितीवर विशेष निमंत्रित राहतील.**

**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे या समितीवर समिती सदस्य म्हणून राहतील.**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे या समितीचे सदस्य सचिव (Member Secretary) म्हणून राहतील.**

## प्रस्तावना

मी, तदर्थ समितीची " समिती प्रमुख " या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

भारताचे संविधान, विधानपरिषद नियम, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिनियम इत्यादींच्या तरतुदींच्या अनुषंगाने सभागृहात विविध मंडळांचे, महामंडळांचे, विविध विद्यापीठांचे अहवाल सादर केले जातात. तथापि, असे अहवाल सादर करण्यास बराच विलंब होतो. तसेच विधानपरिषदेत विवक्षित असे निदेश देऊन काही कागदपत्रे ठेवण्यासंबंधीची आश्वासने, अतारांकित प्रश्नांवरील उत्तरे, लक्षवेधी सूचना तसेच नियम ९३ अन्वये सूचनेची निवेदने इत्यादी संदर्भातही विलंब होतो.

अशाप्रकारे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणा-या सर्व कागदपत्रांबाबत तसेच अहवालासंदर्भात होणारा विलंब टाळण्यासाठी, तसेच यासंदर्भात कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब का होतो ? त्याची कारणमीमांसा काय आहे ? ही कारणमीमांसा नियमाप्रमाणे समर्थनीय आहे किंवा कसे ? यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दतीत कोणते बदल अपेक्षित आहेत ? या कार्यपध्दतीवर योग्य प्रकारे संनियंत्रण कशाप्रकारे ठेवता येईल ? इत्यादी बाबींचे परिनिरिक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी लोकसभा व राज्यसभेच्या धर्तीवर " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत " (Committee on Papers Laid on the Table) या नावाची विधानपरिषदेच्या ८ सदस्यांचा समावेश असलेली तदर्थ समिती दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ रोजी विधानपरिषद सभागृहात महाराष्ट्र विधानपरिषद नियम १५८(१) अन्वये गठीत करण्यात आली.

अशाप्रकारे विधानपरिषदेच्या आठ सदस्यांची तदर्थ समिती गठीत करण्यात येऊन सदरहू समितीवर मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. संसदीय कार्यमंत्री व मा. संसदीय कार्य राज्यमंत्री यांची " विशेष निमंत्रित " म्हणून तर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन ह्यांची या समितीवर " समिती सदस्य " व प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे या समितीचे " सदस्य सचिव " म्हणून नियुक्ती करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व समित्यांची मुदत सर्वसाधारणपणे एक वर्षाची किंवा नवीन समिती नामनिर्देशित करण्यात येईपर्यंत राहते. या अनुषंगाने सन २०२१ - २०२२ या कालावधीसाठी नव्याने गठीत करण्यात आलेल्या " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत " (Committee on Papers Laid on the Table ) या तदर्थ समितीवर प्रथेनुसार मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे " समिती प्रमुख " राहतात. माझी विधानपरिषदेच्या उपसभापती पदी दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी निवड झाली असल्याने या तदर्थ समितीवर मी समिती प्रमुख म्हणून कार्यरत आहे.

सदरहू तदर्थ समितीची प्रारंभिक बैठक दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी घेण्यात आली. तसेच समितीच्या दिनांक ९ मार्च, २०२१, १८ मे, २०२२, २ जून, २०२२, २२ जुलै, २०२२, ५ ऑगस्ट, २०२२ तसेच १८ नोव्हेंबर, २०२२ अशा एकूण **सात बैठका** घेण्यात आल्या. भारताचे संविधान, विधानपरिषद नियम, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिनियम इत्यादींच्या तरतुदींच्या अनुषंगाने सभागृहात वेगवेगळ्या महामंडळाचे अहवाल सादर करण्यास बराच विलंब होतो. तसेच विधानपरिषदेचे विवक्षित असे निदेश देऊन काही कागदपत्रे ठेवण्यासंबंधीची आश्वासने, अतारांकित प्रश्नांवरील उत्तरे, नियम ९३ अन्वये सूचनेची निवेदने व इतर संसदीय आयुधांवरील उत्तरांच्या संदर्भातही विलंब होतो.

सदरहू विलंबाबाबत समितीला विभागाच्या प्रतिनिधींच्या साक्षीच्या माध्यमातून आलेल्या त्यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखी व मौखिक माहितीच्या आधारे या सर्व प्रकरणांची सखोल छाननी करुन समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात नमूद केल्या आहेत. विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिका-यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती पुरविली व समितीच्या कामकाजात सहाय्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत " प्रारुप अहवाल " विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक : २२ डिसेंबर, २०२२.

**डॉ. नीलम गो-हे,**
समिती प्रमुख, तदर्थ समिती
तथा मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

# अहवाल

## पार्श्वभूमी

भारताचे संविधान, विधानपरिषद नियम, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिनियम इत्यादींच्या तरतुदींच्या अनुषंगाने सभागृहात वेगवेगळ्या महामंडळाचे अहवाल सादर केले जातात. तथापि, असे अहवाल सादर करण्यास बराच विलंब होतो. तसेच विधानपरिषदेत विवक्षित असे निदेश देऊन काही कागदपत्रे ठेवण्यासंबंधीची आश्वासने, नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने इत्यादी संदर्भातही विलंब होतो. महाराष्ट्र विधानमंडळात, राज्य शासनातर्फे वेगवेगळ्या महामंडळाचे, मंडळाचे वार्षिक अहवाल, जमा खर्चाचे विवरण, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना इत्यादी बाबी मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अधिक माहिती, मा. मंत्री महोदय ब-याच कालावधीनंतर अनेक वर्षाची कागदपत्रे एकाचवेळी सभागृहाच्या पटलावर ठेवतात. त्यावेळी सभागृहात उपस्थित असलेले अनेक मा. सदस्य आक्षेप घेतात व विलंबाची कारणे विचारतात. त्यावेळी मा. मंत्री महोदय यासंदर्भात खुलासा करुन पुढच्या वेळी दक्षता घेण्यात येईल असे सांगतात. अनेक वेळा अहवाल वेळच्यावेळी सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत मा. पीठासीन अधिकारी संबंधित विभागांच्या मा. मंत्री महोदयांना आदेश देतात. परंतु विलंबाच्या कारणांची छाननी, ती कारणे योग्य आहेत की नाही याची तपासणी महाराष्ट्र विधानमंडळातर्फे करणे शक्य होत नाही. उक्त समिती गठीत करण्यासंदर्भात ब-याच सदस्यांकडून सभागृहात वारंवार मुद्दा उपस्थित करण्यात आला असून लोकसभा/राज्यसभा व देशातील इतर विधानमंडळांप्रमाणे सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणे यासंबंधाची तदर्थ समिती दिनांक ६ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत गठीत करण्यात आली.

तसेच, सदर विधानसभेमध्ये समिती गठीत झाल्यानंतर विधानसभेप्रमाणेच विधानपरिषदेकडे देखील " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत " (Committee on Papers Laid on the Table) ही तदर्थ समिती गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

त्या अनुषंगाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १५८(१) अन्वये मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत " (Committee on Papers Laid on the Table) ही तदर्थ समिती गठीत केली. सद्यःस्थितीत सन २०२१-२०२२ या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या तदर्थ समितीवर सदस्य नामनिर्देशित केले असून सदर समितीवर सद्यस्थितीत खालील सदस्य आहेत :—

(१) डॉ. नीलम गो-हे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

(२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

(३) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.

(४) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(५) श्री. रामराव पाटील, वि.प.स.

(६) **रिक्त**

(७) **रिक्त**

(८) **रिक्त**

(९) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, मुख्य सचिव तथा समिती सदस्य, महाराष्ट्र शासन.

(१०) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तथा समितीचे सदस्य सचिव.

**विशेष निमंत्रित**

(११) श्री. अंबादास दानवे, मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद.

(१२) श्री. चंद्रकांत पाटील, मा. उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री.

**मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे या समितीचे समिती प्रमुख राहतील.**

**मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, मा. संसदीय कार्य मंत्री व मा. संसदीय कार्य राज्यमंत्री हे या समितीवर विशेष निमंत्रित राहतील.**

**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे या समितीवर समिती सदस्य म्हणून राहतील.**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे या समितीचे सदस्य सचिव (Member Secretary) म्हणून राहतील.**

त्या अनुषंगाने समिती गठीत करण्यात आली व याबाबतचे ज्ञापन क्र. १०५७/ ई-२, दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आले.

तसेच, तदर्थ समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे नेमून दिली.

**समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :—**

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणा-या सर्व कागदपत्रांचे, अहवालांचे खालील बाबतीत परिक्षण करणे हे समितीचे काम असेल :—

(१) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे, अहवाल, नियम ९३ अन्वये सूचनेची निवेदने इत्यादी संविधानातील तरतुदी, अधिनियम, नियमांतील तरतुदी, निदेश इत्यादी अन्वये ठेवण्यात आली आहेत काय व असे करताना संबंधित तरतुदींचे पालन झाले आहे किंवा कसे ?

(२) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे, अहवाल उशिराने ठेवले गेले असल्यास असा विलंब होण्याची कारणे काय आहेत ? अशी कागदपत्रे, अहवाल इत्यादी ठेवताना शासनाने झालेल्या विलंबाची कारणे दिली आहेत काय व दिलेली कारणे समर्थनीय आहेत काय ?

(३) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणा-या सर्व कागदपत्रांबाबत, अहवालांबाबत होणारा विलंब टाळण्यासाठी विशिष्ट कार्यपध्दती आखून देणे.

(४) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्यासंदर्भात माननीय अध्यक्ष वेळोवेळी विवक्षितपणे समितीकडे नेमून देतील अशी अन्य कामे.

सदरहू समितीची **प्रारंभिक बैठक बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी** विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीत माननीय समिती प्रमुख तथा उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी समितीच्या कार्यकक्षेबाबत व कार्यपध्दतीबाबत प्रास्ताविक केले. विधानमंडळाच्या सभागृहांच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागांकडून होणारा विलंब सन्माननीय सदस्यांकडून वारंवार निदर्शनास आणण्यात आल्यामुळे त्यावर नियंत्रण ठेऊन त्या बाबीचे नियमन करण्याकरिता संसदेच्या धर्तीवर विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबतची स्वतंत्र तदर्थ समिती माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी सभागृहात व्यक्त केलेल्या अभिमतानुसार नव्यानेच गठीत केली असल्याबाबत माननीय समिती प्रमुखांनी प्रतिपादन केले.

सदरहू समिती देशातील एकंदर १५ विधानमंडळांमध्ये कार्यरत आहे. लोकसभा व राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहात देखील ही समिती कार्यरत असून या व्यतिरिक्त दिल्ली, पंजाब इ. विधानमंडळातही अशी समिती कार्यरत आहे.

कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास का विलंब होतो, विलंबाची कारणे कोणती आहेत, संबंधितांकडून सभागृहासमोर सदर कारणमिमांसा ठेवण्यात आली आहे काय, असल्यास कारणे समाधानकारक आहेत काय इत्यादी बाबींचे सखोल परिक्षण करण्याचे काम आता या समितीला करावयाचे आहे.

संसदीय लोकशाही कार्यकारी प्रशासनाच्या कारभारावर विधानमंडळाचे नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या अनुषंगाने श्री. रामराजे निंबाळकर, तत्कालीन माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी या प्रकरणात अत्यंत तातडीने लक्ष घालून समितीची स्थापना केली याबाबत समिती प्रमुखांनी त्यांचे अभिनंदन केले.

सदरहू समितीच्या **दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या प्रारंभिक बैठकीमध्ये** मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मार्गदर्शनपर भाषण केले. समितीची प्रारंभिक बैठक असल्याने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे या बैठकीस उपस्थित होते. सदर बैठकीत शासनाचे जे जे काम चालते त्याची संपुर्ण माहिती या लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहाला आणि सभागृहाच्या

सन्माननीय सदस्यांना अवगत होणे अपेक्षित आहे. काही वेळा बरेच अहवाल विलंबाने प्राप्त, सादर होतात. म. वि. प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना व नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने येत नाही. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निदेश दिल्यानंतरही माहिती येत नाही, कार्यवाही होत नाही, अंमलबजावणी होत नाही, याबाबतीत कार्यपध्दतीवर सनियंत्रण ठेवण्यासाठी राज्यसभेच्या समितीच्या धर्तीवर ही समिती गठीत करण्यात आली. काही प्रकरणात विविध महामंडळाचे, विद्यापीठांचे व स्वायत्त संस्थाचे प्रशासनिक तथा लेखा अहवाल १० ते १२ वर्ष विलंबाने ठेवण्यात येतात. लक्षवेधी सूचनांची निवेदने, ९३ अन्वये सूचनांची निवेदने विभागाकडून विलंबाने प्राप्त होतात. त्यामुळे आवश्यक ती माहिती तातडीने समितीला उपलब्ध करुन देण्याबाबत प्रधान सचिव तथा सदस्य सचिव मार्गदर्शन करतील. त्याचप्रमाणे याबाबतीत शासनाच्या मुख्य सचिवांचे मोलाचे सहकार्य अपेक्षित आहे.

भारताच्या संविधानाला जबाबदार प्रशासन अभिप्रेत असून या प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे काम सभागृहाच्या माध्यमातून आणि निःसत्रकाळात संसदीय समित्यांच्या माध्यमातून करण्यात येत असते. शासन, प्रशासन यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार विधानमंडळाला आहेत अशा प्रकारची भूमिका वारंवार सभागृहात मांडली गेली त्यामुळे ही समिती गठीत करण्यात आली.

सदरहू समितीचे कामकाज अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने माननीय विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, माननीय संसदीय कार्यमंत्री, माननीय संसदीय कार्य राज्यमंत्री यांना विशेष निमंत्रित म्हणून या समितीत स्थान देण्यात आले. प्रशासनाचा एखादा प्रतिनिधी या समितीमध्ये असणे अत्यंत आवश्यक होते म्हणून शासनाच्या मुख्य सचिवांचा देखील समिती सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. जेणेकरुन जी माहिती सभागृहाला वेळेवर आणि तातडीने मिळणे आवश्यक आहे ती माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीकोनातून या समितीचा उपयोग होईल.

सदर बैठकीत मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांनी बैठकीस उपस्थित मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. सदस्यांचे व अधिका-यांचे आभार मानले.

## " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत " या तदर्थ समितीच्या बैठकांसंबंधातील संक्षिप्त माहिती

संविधानिक तरतुदीनुसार शासनाच्या विविध महामंडळाचे व राज्यातील विद्यापीठांचे अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवताना अलिकडील काळात प्रत्येक वेळी त्यास होणा-या विलंबाबाबत विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांकडून सातत्याने विचारणा करण्यात येत होती. एकंदरीत शासकीय यंत्रणेवर विधानमंडळाचा अंकुश राहिला नसल्याची बाब त्यायोगे मा. सदस्य सभागृहाच्या निदर्शनास आणून देत होते. त्यावर नियंत्रण ठेऊन त्याबाबींचे नियमन करण्यासाठी संसदेच्या धर्तीवर विधानपरिषदेची स्वतंत्र समिती गठीत करणेबाबत मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विधानपरिषदेची " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत " समिती गठीत करण्याबाबत सभागृहात व्यक्त केलेल्या अभिमतानुसार सदरहू समिती नव्याने गठीत करण्यात आली. अशाप्रकारची समिती देशातील एकंदर १५ विधानमंडळांमध्ये कार्यरत असून लोकसभा व राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहात देखील ती कार्यरत आहे.

या समितीच्या, प्रारंभिक बैठक वगळता एकूण ६ बैठका संपन्न झाल्या. या बैठकींमध्ये झालेल्या कामकाजाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

समिती गठीत झाल्यानंतर **दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी** विधानभवन, मुंबई येथे झालेल्या **प्रारंभिक बैठकीत** प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद महोदयांनी त्यांच्या कार्यकाळात झालेल्या समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला.

तसेच मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांनी असे अभिप्राय दिले की, 'ज्या ज्या राज्यांमध्ये अशाप्रकारची समिती गठीत करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून कोणत्या प्रकारचे काम, कशाप्रकारे केले जात आहे याबाबतची माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक राहिल. विधानमंडळाच्या सदस्यांना कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या विविध संसदीय आयुधांपैकी लक्षवेधी सूचनांची निवेदने, तारांकित, अतारांकित प्रश्नांची उत्तरे, नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने, विशेष उल्लेख व औचित्याचे मुद्द्यांसंबंधातील माहिती विभागाकडून विलंबाने प्राप्त होत असल्याने तसेच विविध महामंडळांचे अहवाल

देखील विलंबाने प्राप्त होत असल्याने त्याबाबत संबंधित विभागीय सचिवांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत व ती समितीपुढे सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. या समितीची कार्यकक्षा मा. सदस्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समितीच्या पुढील बैठकीपासून गृह विभाग, शालेय शिक्षण विभाग, महसूल विभाग व नगरविकास विभाग यांच्याकडे लक्षवेधी सूचना ९३ अन्वये सूचना, विशेष उल्लेख सूचना, औचित्याचे मुद्दे व अतारांकित प्रश्नांची उत्तरे तसेच विविध महामंडळांचे प्रलंबित असलेले अहवाल यांची प्रलंबित उत्तरे मागवून घेण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करू.'

**मंगळवार, दिनांक ९ मार्च, २०२१** रोजीच्या बैठकीत समितीच्या अवर सचिव यांनी विविध संसदीय आयुधांची सन २०१५ पासून मंत्रालयीन विभागाकडे प्रलंबित असलेली विभागनिहाय माहिती समितीपुढे ठेवली.

त्यावर शालेय शिक्षण विभाग व नगरविकास विभाग या दोन विभागांची सर्वात जास्त आयुधांची माहिती प्रलंबित आहे. प्रलंबित प्रकरणांची सद्य:स्थिती विभागाने कळविणे आवश्यक आहे. एका बैठकीमध्ये सर्वसाधारण ५ विभागांच्या सचिवांची साक्ष लावण्यात यावी. तसेच अप्राप्त अहवाल किंवा निवेदने यासंदर्भात संबंधित विभागाला बोलावून विचारणा करण्यात येईल, असे मत समितीने व्यक्त केले. विधानमंडळ सचिवालयाकडून विभागांना माहिती पाठविण्याबाबत स्मरणपत्र पाठविण्यात आल्यानंतरही विभागांकडून त्यांची उत्तरे पाठविण्यात येत नाहीत. याबाबत मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुखांनी नाराजी व्यक्त केली.

**बुधवार, दिनांक १८ मे, २०२२ रोजी** झालेल्या बैठकीत समितीच्या उप सचिवांनी समितीची स्थापना, कार्य व उद्देश याबाबतची माहिती दिली व असे सुचविले की, शासकीय आयुधे सभागृहात मांडल्यानंतर ते मान्य झाल्यास त्यावर उत्तर देण्यासाठी काही कालावधी विहित केला जातो. विहित मुदतीत संबंधीत शाखेला विभागाने उत्तर देणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने समितीने अशी शिफारस केली की, ज्या-ज्या विभागांची प्रलंबित संख्या

जास्त प्रमाणात आहे त्या विभागांच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी तसेच अधिवेशन संपण्याच्या दोन दिवस अगोदर सर्व बाबींचा आढावा सभागृहात घोषित केल्यास यामध्ये काही सुधारणा होतील. कोणत्या आयुधासाठी किती कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे याचा एक तक्ता तयार करुन समितीला सादर करावा तसेच मंत्रालयीन विभागाकडे प्रलंबित असलेल्या लक्षवेधी सूचना, म.वि.प. नियम ९३ अन्वये देण्यात आलेल्या सूचना तसेच विशेष उल्लेख सूचना यांच्या तक्त्याचे अवलोकन केले असता शालेय शिक्षण विभाग, नगर विकास विभाग, गृह विभाग तसेच वस्त्रोद्योग विभाग यांच्याकडे जास्त प्रश्न प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. ज्या विभागाकडे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही त्यांचा एक वेगळा तक्ता तयार करावा. जेणेकरुन, ती माहिती अहवालामध्ये सभागृहाला सादर करता येईल तसेच ज्या विभागांकडे जास्त प्रश्नांची उत्तरे प्रलंबित आहेत त्यापैकी दोन-दोन विभागांची एकत्रित साक्ष आयोजित करण्यात यावी असे करताना जास्त प्रश्न प्रलंबित असणा-या विभागाची साक्ष अगोदर घेतल्यास इतर विभागांना देखील त्याची माहिती मिळेल व ते आपल्याकडील प्रश्न लवकरात लवकर निकाली काढतील. गुरुवार, दिनांक ०२ जून, २०२२ रोजी पुढील बैठकींचे आयोजन करुन त्या बैठकीत शालेय शिक्षण व गृह विभागाची साक्ष ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

**गुरुवार, दिनांक ०२ जून, २०२२** रोजीच्या बैठकीत शालेय शिक्षण व गृह विभागाच्या सचिव स्तरावरील प्रतिनिधींची साक्ष ठेवण्यात आली होती.

**गृह विभाग :—**

समितीने प्रथमतः गृह विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. लक्षवेधी सूचनांची निवेदने, अतारांकित प्रश्नांची उत्तरे, नियम ९३ अन्वये सूचना, विशेष उल्लेखाची सूचनांची उत्तरे विभागाकडून विहित मुदतीत दिली जात नाहीत ही गंभीर बाब आहे. काही सदस्य सेवानिवृत्त झाले तरी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जात नाही याबाबत समितीने खेद व्यक्त केला. गृह विभागाच्या प्रलंबित अहवालांपैकी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे सन २०१४ ते २०१८ पर्यंतचे ४ अहवाल प्रलंबित आहेत. सदरहू ४ अहवाल व महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्यादित यांचे ३ अहवाल प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली.

यावर गृह विभागाने याबाबत गंभीर दखल घेऊन सहा महिन्यांपासून वेळोवेळी सचिव स्तरावर आढावा घेतला आहे. या वर्षातील विविध संसदीय आयुधांची प्रलंबित उत्तरे देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती व अध्यक्षांचे पद देखील रिक्त होते त्यामुळे अहवाल सादर करण्यात आले नसल्याची माहिती विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस दिली.

**शालेय शिक्षण विभाग :—**

समितीने शालेय शिक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. गृह विभागापेक्षा शालेय शिक्षण विभागाकडे प्रलंबित प्रश्नांची संख्या अधिक आहे. सदर आयुधांची उत्तरे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच सर्व प्रलंबित आयुधांची उत्तरे देण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागेल याबाबत समितीने विचारणा केली.

याबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून उत्तरे प्राप्त होत नसल्याचे विभागाच्या प्रतिनिधींनी समितीच्या निदर्शनास आणले. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाकडून अप्राप्त उत्तरांबाबत सचिव यांच्याशी चर्चा करुन उक्त प्रकरणांची वेगळी चौकशी करण्यात यावी. तसेच क्षेत्रिय कार्यालयाकडून कोणत्या प्रश्नांची उत्तरे अप्राप्त आहेत, याबाबतची सर्व माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली.

तसेच समितीने निर्णय घेतला की, ज्या विभागांचे पाचपेक्षा जास्त अहवाल प्रलंबित आहेत त्याबाबत प्राधान्याने आढावा घेण्यात येईल. त्यानुसार कामगार, सामाजिक न्याय, जलसंधारण, उच्च व तंत्रशिक्षण तसेच सामान्य प्रशासन विभागांतर्गत येत असलेल्या महामंडळांच्या प्रलंबित अहवालाच्या अनुषंगाने तसेच त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांच्या संदर्भात विभागीय सचिव व सर्व संबंधित अधिका-यांकडून आढावा घेण्यात येईल तसेच अहवाल प्रलंबित असलेल्या महामंडळावर कोण अधिकारी कधीपासून कार्यरत होते याबाबतची सुद्धा माहिती विभागाला सोबत घेऊन येण्याबाबत कळविण्यात यावे.

**शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०२२** रोजी सामान्य प्रशासन विभाग, कामगार विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग व संसदीय कार्य विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष नोंदविण्यात आली.

**सामान्य प्रशासन विभाग** :—

समितीने सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. लोक आयुक्त आणि उप लोकआयुक्तांचा अहवाल सन २०१७ पासून प्रलंबित असल्याकारणाने विलंब लागण्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचे सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ पर्यंतचे अहवाल प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत याबाबतही समितीने विचारणा केली. महामंडळाचा अहवाल किती दिवसात सादर करावा याबाबत काही नियम असावेत. जेव्हा महामंडळाचा अहवाल तयार करण्यात येईल तेव्हा त्यामध्ये सर्वसाधारण सभा नियमित झाल्या पाहिजेत. निदान दोन वर्षातून एकदा बैठक झाली पाहिजे अशी समितीने शिफारस केली.

**कामगार विभाग** :—

समितीने कामगार विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. विभागाचे ऑनलाईन मॉनिटरिंग होते. तसेच सन २००५ पासून कामगार विभागाचे अहवाल प्रलंबित असल्याने सदरहू अहवाल प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली. तसेच अधिवेशनाचे ऑनलाईन प्रसारण देखील होते. त्यामुळे विभागाने विविध संसदीय आयुधांची उत्तरे तीन ते पाच दिवसात तयार ठेवायला पाहिजे. धोरणात्मक प्रश्न असेल तर त्यावर विभाग धोरणात्मक विचार करीत आहे असे विभागाद्वारे कळविण्यात यावे, अशी समितीने शिफारस केली.

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग** :—

समितीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. औचित्याच्या मुद्द्यांसंबंधी विभागाकडून १५ दिवसांमध्ये व विशेष उल्लेखासंबंधी एक महिन्यामध्ये उत्तर देणे अत्यावश्यक असल्याचे अभिप्राय समितीने नोंदविले. उच्च व

तंत्रशिक्षण विभागाचे सन २०१२ पासूनचे अहवाल प्रलंबित आहेत. यात विविध विद्यापीठांचा समावेश आहे. सदरहू अहवाल प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली. तसेच यासंदर्भात विद्यापीठाने अहवाल तयार केले आहेत की नाहीत यासंदर्भात विभागाने पाठपुरावा केला आहे किंवा नाही याबाबत देखील समितीने विचारणा केली.

**जलसंधारण विभाग :—**

समितीने जलसंधारण विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. जलसंधारण विभागाचे सन २०१२ पासूनचे अहवाल प्रलंबित आहेत. त्याबाबतची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :—**

समितीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचे ३ व अपंग आयुक्त कल्याणचे सन २०१६ ते २०२२ पर्यंतचे ६ अहवाल प्रलंबित असल्याने सदर अहवाल किती दिवसांत सादर करण्यात येणार आहेत, याबाबत समितीने विचारणा केली. तसेच अहवाल समाप्तीपर्यंत आले असतील आणि प्रक्रिये प्रमाणे पूर्ण झाले असतील तर माननीय मंत्र्यांनी ते तपासून घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी समितीने शिफारस केली. तसेच प्रलंबित असलेल्या विभागाशी संबंधित संसदीय आयुधांसंदर्भातील विषय मागासवर्गीय, अपंग, मतिमंद, कर्णबधीर, अनाथ मुले, लहान बालके यांच्या कल्याणाशी संबंधित असल्याने त्याबाबत विभागाच्या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत समितीने निदेश दिले.

**संसदीय कार्य विभाग :—**

समितीने संसदीय कार्य विभाग हा समन्वय विभाग म्हणून असल्याने सर्वच विभागांकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांसंदर्भात सदर विभागामार्फत करण्यात आलेल्या

कार्यवाही व पाठपुराव्यासंदर्भात आढावा घेतला. वस्त्रोद्योग, कृषी, उद्योग, जलसंपदा, गृहनिर्माण, नगरविकास या विभागांशी संबंधित विविध संसदीय आयुधांची उत्तरे जास्त प्रमाणात प्रलंबित असल्याने संसदीय कार्य विभागाने यामध्ये लक्ष घातले पाहिजे, अशी समितीने शिफारस केली.

**शुक्रवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२२** रोजी वस्त्रोद्योग विभाग, कृषी विभाग, उद्योग विभाग, जलसंपदा विभाग व गृहनिर्माण विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष नोंदविण्यात आली.

**वस्त्रोद्योग विभाग :—**

वस्त्रोद्योग विभागाच्या साक्षीच्या वेळी पुलगाव कॉटन मिलच्या प्रलंबित असलेल्या अहवालांबाबत तसेच मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळाबाबत समितीद्वारे विचारणा करण्यात आली. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी " पुलगाव कॉटन मिल सन २००५ मध्ये व मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ हे दिनांक १ ऑक्टोबर, २००८ रोजी खाजगी प्रवर्तकास विकण्यात आले असल्याची बाब " समितीच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर मंत्रिमंडळाची परवानगी घेऊन महामंडळांच्या विक्रीस हरकत नाही. परंतु सदर आस्थापना संसदीय कार्यकक्षेत नसल्याची विधानमंडळाकडे नोंद होण्यासाठी संबंधित विभागाकडून विधानमंडळास कळविण्यात यावे, असे समितीने निदेश दिले.

तसेच समितीने वस्त्रोद्योग विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. सन २०१३ मध्ये विचारण्यात आलेल्या मुंबईतील गिरणी कामगारांच्या घराचा अतारांकित प्रश्न वस्त्रोद्योग विभागाशी संबंधित नसल्याने गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरीत करण्यासाठी याबाबतची नस्ती मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यात आल्याची बाब वस्त्रोद्योग विभागाच्या प्रतिनिधींनी समितीच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर " अशा प्रश्नांबाबत चालू असलेली कार्यवाही विभागाने वेळोवेळी विधानमंडळास कळविणे अपेक्षित आहे " असे समितीने निदेश दिले.

**कृषी विभाग :—**

यानंतर कृषी विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली. त्यात प्रामुख्याने कृषी विभागांतर्गत असलेल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या ४ कृषी विद्यापीठांच्या प्रलंबित अहवाल तसेच लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक लेख्यांबाबत चर्चा झाली. अहवाल सादर करण्यासाठी उशीर होतो व त्याची अनेक कारणे सांगितली जातात. त्यामुळे अहवाल सादर करण्यासाठी एखादी कालमर्यादा निश्चित केली पाहिजे, असे अभिप्राय समितीने नोंदविले.

यासंदर्भात कृषी विभागाच्या प्रतिनिधींनी समितीसमोर असे विशद केले की, विद्यापीठांचे काही विषय ऑटोनॉमस असल्यामुळे विभागालाही काही मर्यादा असतात. मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत अहवाल सभागृहात ठेवावा लागत असल्याने त्यांच्या अनुवादास विलंब होतो. तसेच विद्यापीठांच्या वार्षिक लेख्यांसंदर्भातील लेखा परिक्षण करण्याकरिता विलंब होत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

त्यानंतर कृषी विभागाच्या पुढील विद्यापीठ व महामंडळांच्या प्रलंबित अहवालांसंदर्भात समितीने चर्चा केली :–

**बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली**

या विद्यापीठाच्या विभागीय प्रतिनिधींनी असे सादर केले की, वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल तयार करताना लेखापरिक्षणाच्या कामासाठी बराच वेळ लागतो. यासंदर्भात सदर काम लवकर करुन घ्यावे असे समितीने निदेश दिले.

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी**

या विद्यापीठाचे सन २०१४ पासूनचे अहवाल प्रलंबित असल्याबाबत समितीने विचारणा केली. हा देखील मोठा प्रश्न असल्याचे मत समितीने व्यक्त केले. यासंदर्भात विभागाच्या प्रतिनिधींनी हे विषय पूर्ण करीत असून यासंदर्भात दिलगिरी व्यक्त केली.

**महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, मर्यादित**

या महामंडळाच्या सन २०१९-२०, सन २०२०-२१ या वर्षाचे अहवाल सादर होतील, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले.

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे**

याबाबतीत समितीने विचारणा केली असता, शेती महामंडळ कंपनी ॲक्टनुसार रजिस्टर आहे. सन २०१९-२०२० या वर्षाचे अकाऊंट तयार असून मंडळाची बैठक न झाल्यामुळे त्याला मान्यता मिळालेली नाही व कॅग रिपोर्ट आला नाही. परिणामी अहवाल सादर करता आले नसल्याचे विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**

उक्त महामंडळाच्या अहवालांबाबत समितीने विचारणा केली असता, महाव्यवस्थापकांनी त्यांच्याकडील प्रलंबित अहवालांबाबत माहिती दिली. याबाबत सदरहू अहवाल हिवाळी अधिवेशनात सभागृहाला सादर करावेत, असे समितीने निदेश दिले.

याव्यतिरिक्त समितीने कृषी विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. औचित्याच्या मुद्याचे उत्तर लवकर मिळावे अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा असते. यासंदर्भात पीठासीन अधिकारी निदेश देतात. परंतु विभागाकडून लवकर उत्तर मिळत नाही, असे मत समितीने नोंदविले. तसेच विभागाकडे प्रलंबित असलेल्या बाबी लवकरात लवकर निकाली काढाव्यात व समितीने सूचना दिल्यानुसार कार्यवाही करावी, असे निदेश समितीने दिले.

**उद्योग विभाग :—**

यानंतर उद्योग विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली. त्यात उद्योग विभागाशी संबंधित असलेल्या महामंडळांच्या प्रलंबित अहवालांबाबत समितीने विचारणा केली.

सदर चर्चेमध्ये विभागीय प्रतिनिधींमार्फत मराठवाडा विकास महामंडळ, मेल्ट्रॉन, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, कोकण विकास महामंडळ ही ५ महामंडळे वित्त विभागाने परिसमर्पित करण्याचा निर्णय सन २०१३ मध्ये घेण्यात आला असून पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ सोडून इतर महामंडळांकडे कोणतेही काम व कर्मचारीवर्ग नसल्याचे सांगण्यात आले. तसेच पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, कोकण विकास महामंडळ व विदर्भ विकास महामंडळ यांचे सन २०२० - २१ व २०२१-२२ चे अहवाल तयार करून

घेण्यात येतील असे देखील सांगण्यात आले. यासंदर्भात जी महामंडळे केवळ कागदोपत्री आहेत, त्यांचे अहवाल देणे का अवघड आहे याबाबत पुनर्विचार करण्याबाबत विभागाकडून पत्र देण्यात येऊन त्यामध्ये कारणे देखील नमूद करावीत असे समितीने निदेश दिले. तसेच जोपर्यंत महामंडळे सुरु आहेत तोपर्यंत त्यांचे अहवाल प्रलंबित दिसणार आहेत. महामंडळ बंद करण्याबाबत कॅबिनेटमध्ये निर्णय होतो काय, त्याबाबत कार्यपध्दती काय आहे याबाबत देखील समितीने विचारणा केली. समितीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण अहवालांबाबत माहिती घेतली.

याव्यतिरिक्त समितीने उद्योग विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. अधिवेशन सुरु असताना ज्या दिवशी औचित्याचा मुद्दा असतो त्याच दिवशी किंवा अधिवेशन कालावधीतच त्याचे उत्तर विभागाने दिले पाहिजे. यामुळे आमदारांचेही समाधान होईल आणि विभागाचे काम देखील सोपे होईल असे अभिप्राय समितीने नोंदविले.

**जलसंपदा विभाग :—**

जलसंपदा विभागाच्या विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली असता त्यांनी महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ तोट्यात असल्यामुळे सन २०११ नंतर महामंडळाचा कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही आणि सदर महामंडळ बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून मा. उच्च न्यायालयाने देखील महामंडळ बंद करण्यास परवानगी दिली असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणून दिली. सदर महामंडळ अवसायनात गेल्यामुळे त्यांचे वार्षिक अहवाल सादर केले जात नाहीत हे रेकॉर्डवर घेऊन सभागृहाच्या निदर्शनास आणण्यात यावेत तसेच अशा महामंडळांची व त्यांच्या प्रलंबित अहवालांची यादी विधानमंडळास सादर करावी, असे निदेश समितीने दिले.

तसेच जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे सन २०१८ ते २०२२ दरम्यानचे चार प्रलंबित वार्षिक वित्तीय अहवाल, विदर्भ विकास महामंडळाचे प्रलंबित अलग लेखा अहवाल, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे प्रलंबित वार्षिक लेखे व अलग लेखापरिक्षण अहवाल, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

यांचे प्रलंबित वार्षिक वित्तीय अहवाल व स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल, महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादितचे प्रलंबित अहवाल, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे प्रलंबित स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे प्रलंबित वार्षिक अहवाल व स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे प्रलंबित वार्षिक व लेखा अहवाल याबाबत समितीने विभागीय प्रतिनिधींकडे विचारणा केली.

सदर चर्चेदरम्यान विभागीय प्रतिनिधींनी काही महामंडळांचे वार्षिक अहवाल व वार्षिक लेखा अहवाल एकच असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. अशाप्रकारे वार्षिक लेखा अहवाल व वार्षिक अहवाल ही एकच बाब असल्यास, अहवालाच्या नामाभिधानामध्ये बदल झाल्यास त्याबाबत विधानमंडळास कळविण्यात यावे. मुळात अहवाल म्हणजे महामंडळाचे काय कार्यक्रम झाले त्याचा अहवाल नसतोच. त्यामध्ये प्रामुख्याने हिशोबच असणे अपेक्षित असते. या अहवालांमध्ये जे काही महामंडळाचे फायनान्शियल इम्पिलीकेशन्स आहेत ते येणे अपेक्षित आहे, असे अभिप्राय समितीने नोंदविले.

याव्यतिरिक्त समितीने जलसंपदा विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला.

विविध विभागांकडे प्रलंबित संसदीय आयुधांबाबत सचिव, संसदीय कार्य विभाग यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, संसदीय कार्य विभागामार्फत विविध प्रलंबित संसदीय आयुधांबाबत जेव्हा बैठक घेण्यात येते तेव्हा विभागांकडून जी उत्तरे दिली जातात. तिच उत्तरे या समितीच्या बैठकीत देखील देण्यात येतात. संसदीय कार्य विभागामार्फत जेव्हा बैठक घेतली जाते तेव्हा विभागांकडून सांगितले जाते की प्रलंबित संसदीय आयुधांची उत्तरे देण्याचे काम ८ दिवसात, १५ दिवसात पूर्ण करु, परंतु ती पूर्ण होतच नाहीत. संसदीय कार्य विभागाकडे समन्वय आहे त्यामुळे या बाबींशी जे जे संबंधित आहेत त्या सर्वांची एक बैठक लावून लवकरात लवकर प्रकरणांचा निपटारा करण्यात येईल.

त्यावर समितीने अभिप्राय दिले की, ज्यांच्याकडून परत परत तिच उत्तरे दिली जातात त्यांची संसदीय कार्य विभागाने चौकशी करावी. केवळ किरकोळ कारणांसाठी उत्तर देण्याचे काम पुढे ढकलायचे हे योग्य नाही. या प्रकरणांचे एक महिन्याच्या आत उत्तर द्यावे. परत परत तिच उत्तरे मिळतात त्यावर संसदीय कार्य विभागाने उपाययोजना करावी.

त्याबाबत सचिव, संसदीय कार्य विभाग यांनी यासंदर्भात मुख्य सचिवांकडे बैठक घेण्यात येते व याबाबत मुख्य सचिव सर्वांना निर्देश देतात, असे समितीच्या निदर्शनास आणले.

**गृहनिर्माण विभाग :—**

गृहनिर्माण विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली. यामध्ये गृहनिर्माण विभागाशी संबंधित असलेल्या प्राधिकरणांच्या प्रलंबित अहवालांसंदर्भात समितीने विचारणा केली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे तसेच महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबईचे अहवाल प्रलंबित असल्याच्या कारणांसंदर्भात समितीने माहिती प्राप्त करुन घेतली.

याव्यतिरिक्त समितीने गृहनिर्माण विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. सदर प्रकरणी संसदीय कार्य विभागाने सूचना दिल्या तर काही परिणाम होत नाही. परंतु या समितीने सूचना दिल्या तर सकारात्मक परिणाम होतो, असे काही आहे काय, असे असेल तर समिती जास्तीत जास्त बैठका घेऊन जास्तीत जास्त सूचना देण्याचा प्रयत्न करेल. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या आयुधांची उत्तरे त्यांना प्राप्त झाली नाही तर ते संबंधित अधिका-यांच्या निलबंनाची मागणी करतात. ही बाब बरोबर नाही. म्हणून समिती या बाबींचा पाठपुरावा करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या आयुधांना विभागाने नियमानुसार उत्तर देणे अपेक्षित आहे. विभागाने विशेष उल्लेखासारख्या आयुधांना उत्तरे देणे आवश्यक आहे. काही सन्माननीय सदस्य मयत झालेले आहेत तर काही सन्माननीय सदस्यांच्या मुदती संपलेल्या आहेत. अशा सन्माननीय सदस्यांना विधिमंडळ व मंत्रालयातील अधिका-यांविषयी काय वाटत असेल किंवा पिडीत लोकांचे काय होत असेल. अधिकारी योग्य काम करीत नसल्यामुळे लोकांमध्ये नैराश्य निर्माण होते, असे अभिप्राय समितीने नोंदविले.

तसेच यामुळे सदर विषयाबाबत विधानमंडळ व संबंधित विभाग संवेदनशील नाही असा संदेश लोकांमध्ये जातो. या सर्व आयुधांबाबतची माहिती १५ दिवसांत समितीला सादर करावी. विधीमंडळाकडून पत्र येऊ शकते हा विचार करुन पुढच्या अधिवेशनात या सर्व आयुधांची उत्तरे मिळायला हवी. आधीचे काय काय प्रश्न प्रलंबित आहेत ते पाहता येईल. परंतु सुरु असलेल्या अधिवेशनातील प्रश्न लगेच क्लियर केले तर मग काही प्रलंबित राहणार नाही, असे देखील अभिप्राय समितीने नोंदविले.

**शुक्रवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२** रोजीच्या बैठकीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, नगरविकास विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, गृहनिर्माण विभागाच्या प्रतिनिधींची प्रलंबित अहवाल व विविध संसदीय आयुधांच्या प्रलंबित उत्तराबाबत साक्ष घेण्यात आली.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :—**

समितीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. यात विभागाकडे सन २०१५ पासून प्रलंबित असलेल्या लक्षवेधी सूचनांबाबत समितीकडून विचारणा करण्यात आली असता सदर सर्व प्रलंबित लक्षवेधी सूचना तसेच इतर संसदीय आयुधांची उत्तरे एक महिन्याच्या आत सादर करण्यात येतील, असे विभागाच्या प्रतिनिधींमार्फत सांगण्यात आले. तसेच म. वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख सूचनेमध्ये कोणताही धोरणात्मक निर्णय नसतो त्यामुळे प्रलंबित असलेल्या सूचनेचे उत्तर १५ दिवसांच्या आत दिले गेले पाहिजे, अशी शिफारस समितीने केली.

तसेच समितीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत येणा-या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अपंग कल्याण आयुक्तालय, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व ऊसतोड कामगार महामंडळाच्या प्रलंबित असलेल्या अहवालांचा आढावा समितीने घेतला व सदर अहवाल प्रलंबित असल्याची कारणे देखील समितीने विचारात घेतली. सदर प्रलंबित अहवालांचा आढावा घेण्यासाठी संसदीय कार्य विभागासोबत बैठक घेऊनही कोणतीही प्रगती झालेली नाही. महामंडळाच्या नियमानुसार दरवर्षी अहवाल सादर करणे बंधनकारक आहे, असे अभिप्राय समितीने नोंदविले.

**शालेय शिक्षण विभाग :—**

समितीने शालेय शिक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. सन २०१५ पासून सन २०१८ पर्यंतच्या प्रलंबित लक्षवेधी सूचनांबाबत समितीने विचारणा केली असता याबाबत मंत्र्यांसमोर नस्तीद्वारे सर्व परिस्थिती मांडण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या निदर्शनास आणले. तसेच समितीने शालेय शिक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या १७८ अतारांकित प्रश्नांबाबत विभागाच्या प्रतिनिधींकडे विचारणा केली. यापूर्वीच्या माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना धोरणात्मक प्रश्न विचारायला पाहिजे होते. कारण सन २०१५ मध्ये मंत्रिमंडळ बदलले त्यानंतरही सन २०१६ ते सन २०१८ या कालावधीतील विशेष उल्लेख सूचना अनियमित ठेवल्या आहेत. सन २०१९ पासून मंत्रिमंडळ बदलले तेव्हापासून देखील १०० विशेष उल्लेख सूचना प्रलंबित आहेत. यामुळे शिक्षक मतदारसंघातील आमदार खूप नाराज आहेत, असे अभिप्राय समितीने नोंदविले.

**नगरविकास विभाग :—**

नगरविकास विभागाची साक्ष घेण्यात आली. यात नगरविकास विभागांतर्गत येणा-या पिंपरी- चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे प्रलंबित लेखा परिक्षण अहवाल, शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे प्रलंबित वार्षिक अहवाल, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, पनवेलचे प्रलंबित वार्षिक अहवाल, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रलंबित वार्षिक अहवाल, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितचा प्रलंबित वार्षिक अहवाल, महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडचे प्रलंबित वार्षिक अहवाल, महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेडचे प्रलंबित वार्षिक अहवाल व सदरहू अहवाल प्रलंबित असल्याच्या कारणांची समितीने माहिती घेतली.

समितीने नगरविकास विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. अतारांकित प्रश्न सन २०१२ मध्ये १, सन २०१३ मध्ये १, सन २०१५ मध्ये १, सन २०१७ मध्ये ३ प्रलंबित आहेत. ३० दिवसांमध्ये अतारांकित प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक आहे. सन २०१२ मधील प्रलंबित अतारांकित प्रश्नास आता जवळजळ ११ वर्षे झाली

आहेत. अद्याप या बाबत कार्यवाही झालेली नाही. तसेच विशेष उल्लेख अत्यंत स्पेसिफिक असतात. केवळ वस्तुस्थिती विचारलेली असते. याची उत्तरे देण्याचे काम १५ दिवसांत पूर्ण केले पाहिजे, असे निदेश समितीने दिले.

**मदत व पुनर्वसन विभाग :—**

समितीने मदत व पुनर्वसन विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला. यासंदर्भात जी आयुधे हस्तांतरित करणे आवश्यक आहेत, ती हस्तांतरित करण्यात यावीत. तसेच ज्या आयुधांची उत्तरे देणे शक्य आहे, त्या आयुधांची उत्तरे पुढील अधिवेशनापूर्वी सादर करण्यात यावीत, असे समितीने निदेश दिले. तसेच विभागाशी संबंधित तीन प्रलंबित अहवालांबाबत समितीने माहिती घेतली.

**गृहनिर्माण विभाग :—**

गृहनिर्माण विभागाची साक्ष घेण्यात आली. यात गृहनिर्माण विभागांतर्गत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे प्रलंबित अहवाल व ते प्रलंबित असल्याच्या कारणांची माहिती विभागाच्या प्रतिनिधींमार्फत समितीने घेतली. याव्यतिरिक्त समितीने गृहनिर्माण विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध संसदीय आयुधांचा आढावा घेतला.

गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीमध्ये समितीने प्रारुप अहवालावर चर्चा करुन तो संमत करण्यात आला.

## अभिप्राय व शिफारशी

१) " सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत " समिती गठीत झाल्यावर दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ पासून समितीच्या आतापर्यंत ७ बैठका झाल्या आहेत. समितीने या बैठकांमध्ये १) गृह विभाग २) शालेय शिक्षण विभाग ३) सामान्य प्रशासन विभाग ४) कामगार विभाग ५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग ६) जलसंधारण विभाग ७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ८) वस्त्रोद्योग विभाग ९) कृषी विभाग १०) उद्योग विभाग ११) जलसंपदा विभाग १२) गृहनिर्माण विभाग १३) नगरविकास विभाग व १४) मदत व पुनर्वसन विभाग या विभागांच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. या बैठकांमध्ये विविध संसदीय आयुधांपैकी लक्षवेधी सूचना निवेदने, तारांकित/अतारांकित प्रश्नांची उत्तरे, नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने, विशेष उल्लेख व औचित्याचे मुद्दे यांची माहिती विभागांकडून विधानमंडळ सचिवालयास विलंबाने प्राप्त होत असल्याबाबत तर काही बाबतीत विभागांकडून अद्याप कार्यवाही प्रलंबित असल्याचे तसेच विविध महामंडळाचे अहवाल देखील सभागृहास विलंबाने सादर होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. संसदीय कामकाजासंबंधीत असलेल्या विभागांच्या अनास्थेबाबत समितीने नापसंती व्यक्त केली.

बैठकींच्या दरम्यान समितीच्या असेही निदर्शनास आले की, बरेचसे विभाग त्यांच्याशी संबंधित नसलेले विषय दुस-या विभागास हस्तांतरीत करण्यास विलंब करतात. आपल्या विभागाशी संबंधित नसलेल्या विषयाचे हस्तांतरण त्वरीत केले गेल्यास ज्या सदस्याने सदरहू विषय उपस्थित केलेला आहे, त्यास न्याय मिळू शकेल. असेही दिसून आले की, विषय उपस्थित केलेले काही सदस्य निवृत्त झाले आहेत अथवा त्यांचे निधन झाले आहे. बरेचसे विषय हे तत्कालीक असल्याने त्यांना वेळेची कालमर्यादा असते. या विषयांवर विहित कालमर्यादेमध्ये कार्यवाही होणे महत्त्वाचे असते. बहुतांश प्रकरणांची निवेदने हस्तांतरणाअभावी विहित कालावधीत प्राप्त न झाल्याचे दिसून आले. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

सन्माननीय सदस्यांनी विविध संसदीय आयुधांमार्फत उपस्थित केलेल्या विषयांना न्याय मिळण्यासाठी विभागांकडे प्राप्त झालेल्या संसदीय आयुधांवरील उत्तरे/निवेदने त्याच अधिवेशनात अथवा महाराष्ट्र विधानपरिषद नियमांमध्ये विहित केलेल्या कालमर्यादेत विधानमंडळ सचिवालयास तसेच बाब उपस्थित केलेल्या संबंधित सदस्यांस पोहचेल याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी व यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करावी. तसेच, केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस अहवाल सादर झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

२) केंद्र व राज्य शासनाच्या परीनियमातील किंवा भारताच्या संविधानातील तरतूदीच्या अनुषंगाने विविध महामंडळांचे वार्षिक अहवाल/वार्षिक लेखे सभागृहात सादर केले जातात. समितीपुढे प्राप्त झालेल्या माहितीनुसार समितीस असे दिसून आले की, विविध महामंडळांचे अहवाल/वार्षिक लेखे दीर्घ कालावधीपासून सभागृहात सादर झालेले नाहीत. अहवाल प्रलंबित असल्याबाबत समितीने विचारणा केली असता प्रशासकीय कारणास्तव तसेच महामंडळाच्या सर्वसाधारण सभा न झाल्यामुळे अहवाल सभागृहात सादर करण्यास विलंब झाल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. महामंडळांचे अहवाल आर्थिक वर्ष समाप्त झाल्यानंतर सभागृहास सादर करण्याबाबत नियमात तरतूद असते. त्याप्रमाणे सदरहू अहवाल सभागृहास सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच, अहवाल विहित कालावधीत सभागृहास सादर होण्याच्या दृष्टिने संबंधित महामंडळांच्या सर्वसाधारण सभा नियमित आयोजित करण्यात याव्यात, अशी देखील समिती शिफारस करीत आहे.

३) संसदीय कार्य विभाग हा विधानमंडळाच्या कामकाजाशी संबंधित शासनाचे विविध विभाग व विधानमंडळ सचिवालय यांच्यात समन्वयाचे काम पाहतो. संसदीय कार्य विभागाने प्रत्येक अधिवेशनानंतर विविध विभागांकडून अप्राप्त असलेली निवेदने, सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची कागदपत्रे, प्रश्नांची उत्तरे, परिनियमातील तरतूदी

अन्वये सभागृहास सादर करावयाचे विविध महामंडळाचे अहवाल याबाबतच्या माहितीचा प्रत्येक विभागस्तरावर आढावा घ्यावा याकरिता संसदीय कार्य विभागाने दर महिन्यास एक अशी बैठक त्यांच्या स्तरावर घ्यावी, अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.

(४) विविध विभागांकडून अप्राप्त असलेली निवेदने, सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची कागदपत्रे, प्रश्नांची उत्तरे ही महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील तसेच सभागृहास सादर करावयाचे विविध महामंडळाचे, विद्यापीठांचे अहवाल हे विविध परिनियमातील तरतुदीन्वये विहीत कालावधीत सभागृहास सादर केले जातील याची खात्री करण्यासाठी, त्यासंदर्भातील पाठपुरावा करून अशा बाबींची पूर्तता करण्यासाठी तसेच याबाबत संसदीय कार्य विभाग व विधानमंडळ सचिवालयाशी समन्वय साधण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन विभागांमध्ये उप सचिव दर्जाचा प्रत्येकी एक जबाबदार व समर्पित " समन्वय अधिकारी " नेमण्यात यावा, अशी देखील समिती शिफारस करीत आहे.

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकींचा तपशील

## परिशिष्ट

## “ सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत ” तदर्थ समितीची पहिली (प्रारंभिक) बैठक

## बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२१

सन २०२१-२०२२ या वर्षासाठी दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी घटित केलेल्या विधानपरिषदेच्या “ सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत ” तदर्थ समितीची प्रारंभिक बैठक मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद आणि मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :—

**उपस्थिती**

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(१) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स.

(२) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(३) श्री. राजेन्द्र भागवत, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
**(समितीचे सदस्य सचिव)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(२) श्रीमती पुष्पा दळवी, कक्ष अधिकारी.

## दुसरी बैठक

विधानपरिषदेच्या "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत" तदर्थ समितीची बैठक मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मा. उप सभापती यांचे दालन, कक्ष क्रमांक ११४, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(१) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स.

(२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

(३) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(४) श्री. राजेन्द्र भागवत, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**(समितीचे सदस्य सचिव)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(२) श्री. उमेश शिंदे, अवर सचिव .

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी, मंत्रालय, मुंबई**

श्री. भुपेंद्र गुरव, प्रभारी सचिव (विधिविधान) व सचिव (संसदीय कार्य विभाग).

## तिसरी बैठक

विधानपरिषदेच्या "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" तदर्थ समितीची बैठक मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक १८ मे, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, कक्ष क्रमांक ११४, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(१) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स.

(२) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(३) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**(समितीचे सदस्य सचिव)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(३) श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (स.).

## चौथी बैठक

विधानपरिषदेच्या "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" तदर्थ समितीची बैठक मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता, कक्ष क्रमांक ७१२, सातवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**(समितीचे सदस्य सचिव)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (स.).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. संजय सक्सेना, प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग.

(२) श्री. सतीश वाघोले, सचिव, संसदीय कार्य विभाग.

(३) श्री. गिरीश मोहोड, उपसचिव, गृह विभाग.

(४) श्रीमती दिपाली खन्ना, सहायक पोलीस आयुक्त, नाशिक.

(५) श्री. साजन सोनावणे, पोलीस निरीक्षक, नाशिक.

(६) श्री. मंगेश चाळके, पोलीस निरीक्षक, नाशिक.

(७) श्री. गुणाजी शिंदे, पोलीस निरीक्षक, जालना.

(८) श्री. समीर सावंत, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग.

(९) श्री. टि. वा. करपते, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग.

(१०) श्री. वै. र. डुंबरे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग.

## पाचवी बैठक

विधानपरिषदेच्या "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" तदर्थ समितीची बैठक मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी दुपारी ३:०० वाजता, कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**(समितीचे सदस्य सचिव)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (स.).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. नितीन गद्रे, अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग.

(२) श्री. असीम गुप्ता, प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग.

(३) श्री. प्रशांत साजणीकर, सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

(४) श्री. ल. गो. ढोके, सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग ( माजी सैनिकांचे कल्याण).

(५) श्रीमती अश्विनी देशपांडे, अतिरिक्त प्रबंधक, सामान्य प्रशासन विभाग.

(६) श्री. रा. रा. जाधव, संचालक, सामान्य प्रशासन विभाग ( माजी सैनिकांचे कल्याण).

(७) श्री. सो. ना. बागुल, सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

(८) श्री. दिपक पोफळे, उप सचिव, कामगार विभाग.

(९) श्री. दा. सो. खताळ, उप सचिव, कामगार विभाग.

(१०) श्री. दिलीप आ. वणिरे, अवर सचिव, कामगार विभाग.

(११) श्री. सुभाष गावडे, सहसचिव, जलसंधारण विभाग.

(१२) श्री. रा. हे. कागडे, अवर सचिव, जलसंधारण विभाग.

(१३) श्री. आ. वि. वरकरे, कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग.

(१४) श्री. अ.स. बाविस्कर, उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

(१५) श्री. प्रताप लुबाळ, उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

(१६) श्री. सतीश तिडके, उप सचिव (तंत्र), उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

(१७) श्री. नितीन डंगारे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

(१८) श्री. हे. सु. पाठक, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

(१९) श्री. वि. पु. घोडके, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग.

(२०) श्री. रा. ना. सवने, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग.

(२१) श्री. अ. प्र. अहिरे, अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग.

## सहावी बैठक

विधानपरिषदेच्या "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" तदर्थ समितीची बैठक मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी ३:०० वाजता, कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :—

## उपस्थिती

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**(समितीचे सदस्य सचिव)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(३) श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (स.).

**विभागीय प्रतिनिधी** :

(१) श्री. पराग जैन, सचिव, वस्त्रोद्योग विभाग.

(२) श्री. एस. डी. खरात, उप सचिव, वस्त्रोद्योग विभाग.

(३) श्री. एकनाथ डवले, प्रधान सचिव, कृषी विभाग.

(४) श्री. बा. कि. रासकर, सह सचिव, कृषी विभाग.

(५) श्रीमती देशपांडे, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ.

(६) श्री. प्रविण दराडे, व्यवस्थापकीय संचालक, एम. आय. डी. सी., उद्योग विभाग.

(७) श्री. संजय देगांवकर, सह सचिव, उद्योग विभाग.

(८) श्रीमती बोरीकर, महाव्यवस्थापक, विधी व कामकाज, मऔविम, उद्योग विभाग.

(९) श्री. सतिश जोंधळे, सह सचिव, जलसंपदा विभाग.

(१०) श्री. अ. अ. कपोले, कार्यकारी संचालक, ठाणे पाटबंधारे विभाग, जलसंपदा विभाग.

(११) श्री. योगेश म्हसे, मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ म्हाडा, गृहनिर्माण विभाग.

(१२) श्री. सुनिल तुंबारे, उप सचिव, गृहनिर्माण विभाग.

(१३) श्री. अरविंद शेटे, अवर सचिव, गृहनिर्माण विभाग.

## सातवी बैठक

विधानपरिषदेच्या "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" तदर्थ समितीची बैठक मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी २:३० वाजता, कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते :–

### उपस्थिती

**समिती प्रमुख**

डॉ. नीलम गो-हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(३) श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (स.).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. सुमंत भांगे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(२) श्री. दि. रा. डिंगळे, उपसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(३) श्री. इ. मु. काझी, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग.

(४) श्री. सुनिल हंजे, उपसचिव, शालेय शिक्षण विभाग.

(५) श्री. बन्सी गवळी, सहआयुक्त, नगरविकास विभाग.

(६) श्री. सुबराव शिंदे, सह सचिव, नगरविकास विभाग.

(७) श्री. विजय चौधरी, उप सचिव, नगरविकास विभाग.

(८) श्री. शं. प्रां. जाधव, उप सचिव, नगरविकास विभाग.

(९) श्री. निर्मलकुमार चौधरी, नगरविकास विभाग.

(१०) श्री. अ. व्यं. जेवळीकर, नगरविकास विभाग.

(११) श्री. संजय धारुरकर, उप सचिव, मदत व पुनर्वसन विभाग.

(१२) श्री. किशोर तावडे, व्यवस्थापकीय संचालक, गृहनिर्माण विभाग.

(१३) श्री. सु. बा. तुंबारे, उप सचिव, गृहनिर्माण विभाग.

शामुना-एचबी-२२७३-मविमंसना-१२-२०२२-१६० प्रती-पीए-५*